क्रमांक: एलसीएस-१९८१/१००४/प्र.क्र.८४२/ज३

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २२ एप्रिल, १९९४

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा

मौजे चेंबूर एस. एस. ३ व टॅन्क जमीन

हरिजन विकास सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत

प्रस्तावना:-

आयुक्त, कोकण विभाग यांच्या क्रमांक आरबी/डेस्क-२/एलएनडी-११/३४१८ दिनांक २१.७.१९८२ च्या पत्रास अनुसरून आपणांस आता विनंतीपूर्वक कळविण्यास मला निदेश आहे की, एस. एस. नं. ३ आणि टॅन्क लेन्ड चेंबूर येथील ७२/२ मधील जमीन डी.डब्ल्यू.आर.-२१२ या योजनेंतर्गत १९६० साली हरिजन विकास सहकारी गृहनिर्माण संस्थेस विनामूल्य मंजूर करण्यात आली आहे. सदरहू संस्थेत एकूण ३० मूळ सभासद आहेत. संस्थेने मंजूर केलेल्या जमिनीचा संपूर्णत: वापर केलेला नाही. तसेच संस्थेने डी.डब्ल्यू.आर.-२१२ या योजनेंतर्गत घेतलेल्या कर्जाची परतफेडही योग्य त-हेने केलेली नाही. संस्थेने शासनास केलेल्या विविध विनंत्यांच्या संदर्भात सर्वंकषपणे विचार करून शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

अ) संस्थेचे डी.डब्ल्यू.आर-२१२ या योजनेंतर्गत "मागासवर्गीय" असे स्वरूप बदलून " सर्वसामान्य सहकारी गृहनिर्माण संस्था" असे करण्यात यावे ही संस्थेची विनंती अमान्य करण्यात यावी.

ब) हरिजन विकास सहकारी गृहनिर्माण संस्थेने डी.डब्ल्यू.आर-२१२ या योजनेंतर्गत घेतलेले कर्ज, त्यावरील व्याज व शासनाची इतर थकबाकी संस्थेकडून एकरकमी वसूल करावी.

क) संस्थेने मूळ सभासदांव्यतिरिक्त आणखी ८५ सभासद (यादी सोबत जोडली आहे) सामावून घेण्यास परवानगी मिळणेची विनंती केलेली आहे. संस्थेत नवीन सभासद (मागासवर्गीय गृहनिर्माण (डी.डब्ल्यू.आर-२१२) योजनेखालील पात्रतेच्या कसोटीच्या अधीन राहून) सामावून घेण्यास मंजूरी देण्यात यावी. मात्र संस्थेतील सभासदांचे प्रमाण मागासवर्गीय ७५ टक्के व अमागासवर्गीय २५ टक्के एवढे असणे आवश्यक राहील.

....२/-

ड] मूळ सभासदांपैकी ज्या ५ सभासदांची घरे अद्याप बांधलेली नाहीत ती संस्थेने तत्काळ बांधून द्यावीत.

२. प्रस्तुत प्रकरणाबाबतची जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालयाकडील एक संचिका [पृ. १ ते ७५/प] सोबत परत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[द. मि. काटद]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

सोबत:-१]८५ सभासदांची यादी.

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
बी. एस. आर. डी. ए. इमारत,
वान्द्रे [पू.] मुंबई-४०००५१

प्रतिलिपी माहितीसाठी अग्रेषित:-
१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२] जमाबंदी आयुक्त, व संचालक भूमी अभिलेख, मुंबई
३] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
४] महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५] सह संचालक, भूमि अभिलेख, मुंबई.
६] सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई उपनगर जिल्हा
७] वित्त विभाग [व्यय-९] मुंबई
८] समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग
९] सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०] ज३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय [निवडनस्तीकरिता]

Scanned by CamScanner